# बहन्मुंबई महानगरपालिका

**सह आयुक्त (परि.चार) यांचे कार्यालय**

**क्र. एमडीसी/ 4123/ओडी दि 5.04.2021**

## <u>परिपत्रक</u>

**विषयः**- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधातील ई-कोटेशन / अतारांकित निविदा प्रकरणी आढळून आलेल्या अनियमिततेबाबत कंत्राटदारांविरुध्द करण्यात आलेल्या चौकशीच्या अनुषंगाने बजावण्यात येणा-या शिक्षादेशाबाबत.

**संदर्भः- 1) MGC/F/ 5666 दि. 04/03/15 व दि.09/04/15**
**2) MGC/F/ 6684 दि. 25/06/18 व दि.16/08/18**

विषयांकीत प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील CWC कामासंबंधातील ई-कोटेशन/ अतारांकित निविदा प्रकरणी आढळून आलेल्या अनियमिततेबाबत मा. म.न.पा. आयुक्त यांनी दिनांक 04.03.2015 व दिनांक 09.04.2015 रोजी पारित केलेल्या संदर्भ क्र. 1 अन्वयेच्या आदेशान्वये, तत्कालीन उप-आयुक्त (आ.व्य.) सध्या सेवानिवृत्त, तत्कालीन उप आयुक्त (परि.3), तत्कालीन उप-आयुक्त (परि.7) यांचा समावेश असलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीस चौकशी करण्याचे आदेश पारित केले होते. तसेच, म.न.पा. आयुक्तांच्या दिनांक 26.03.2015 अन्वयेच्या आदेशान्वये संबंधित विभाग कार्यालयातील विभाग कार्यकारी अभियंता/ सहाय्यक आयुक्त यांच्यामार्फत संबंधित कंत्राटदारांवर 'कारणे दाखवा नोटीस' बजावून तदनुषंगाने त्रिसदस्यीय समितीस अभिप्राय सादर करण्याचे आदेश पारित केले होते.

चौकशीअंती मा.म.न.पा. आयुक्त यांच्या संदर्भ क्र. 2 अन्वयेच्या मंजूरीनुसार खालील नमूद केलेल्या केलेल्या कंत्राटदारांवर त्यांच्यासमोरील रकान्यात नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

सही/-

**सह आयुक्त (परि.चार)**

**Order Issued By DMC(Z-IV) OFFICE**

| अनु.क्र. | कंत्राटदार | वेन्डर नं. | कंत्राटदारावर करण्यात आलेली कारवाई |
|---|---|---|---|
| १ | मे. अश्वमेध इंजिनिअर ऍण्ड फॅब्रीकेटर | 15452 | मे. अश्वमेध इंजिनिअर ऍण्ड फॅब्रीकेटर (वेन्डर नं. 15452) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत असल्याने, सदर निविदा प्रक्रियेत संगनमत केल्याचे दिसुन येत असल्यास्तव त्यांना ताकिद देण्यात येत आहे की त्यांनी भविष्यात अशा प्रकारचे वर्तन केल्यास त्यांची गंभीर दखल घेण्यात येईल. |
| २ | मे. श्री. सिध्दीविनायक एन्टरप्रायझेस | 17463 | मे.श्री.सिध्दीविनायक एन्टरप्रायझेस (वेन्डर नं. 17463) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत नसल्याने त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| ३ | मे. एच.पी. इन्फ्राप्रोजेक्ट | 18486 | मे. एच.पी. इन्फ्राप्रोजेक्ट (वेन्डर नं. 18486) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत नसल्याने त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| ४ | मे. विनायक कॉर्पोरेशन | 3336 | मे. विनायक कॉर्पोरेशन (वेन्डर नं. 3336) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत नसल्याने त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| ५ | मे. द्रिशा एन्टरप्रायझेस | 18112 | मे. द्रिशा एन्टरप्रायझेस (वेन्डर नं. 18112) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत नसल्याने त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| ६ | मे. डी'कॉन इंडिया कंस्ट्रक्शन्स | 17001 | मे. डी'कॉन इंडिया कंस्ट्रक्शन्स (वेन्डर नं. 17001) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिघ्द होत नसल्याने त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| ७ | मे. के.आर.व्ही. कंस्ट्रक्शन | 18426 | मे. के.आर.व्ही. कंस्ट्रक्शन (वेन्डर नं. 18426) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत नसल्याने त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

सही/-

**सह आयुक्त (परि.चार)**